अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.२२ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ११७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## चिप्पा मार्केट खून प्रकरण; आरोपीस न्यायालयीन कोठडी




**सोलापूर** : शहरातील अशोक चौकात असलेल्या चिप्पा मार्केट येथे युवकाच्या डोक्यात फरशी घालून खून केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपीच्या पोलीस कोठडीत २१ जानेवारीपर्यंत वाढ करण्यात आली होती. कोठडी संपल्याने शनिवारी आरोपीस न्यायालयात हजर केले असता, न्यायाधीश प्रशांत वराडे यांनी त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली. बबलू हुंडेकरी या आपल्या मित्राचा बसवराज अतनुरे (रा.पद्मा नगर,अक्कलकोट रोड,सोलापूर) याने डोक्यात फरशी घालून खून केला होता.या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. देवमाने तसेच विधी अधिकारी ॲड.किणगी यांनी काम पाहिले.

# पवारांच्या देखतच मुख्यमंत्र्यांनी केला धमाका, स्तुतीसुमने उधळत विरोधकांना दिला धक्का

सुराज्य/पुणे

**सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेते एकाच व्यासपीठावर आल्यानंतर राजकीय जुगलबंदी रंगणार नाही,असे होवू शकेल काय? त्यातल्या त्यात कसलेले नेते जवळ जवळ बसले की, एकमेकांना कोपरखळ्या मारणे,एकमेकांना सूचक शब्दातून चिमटे घेणे, असे प्रकार होतातच. त्यातून समोर बसलेल्या लोकांमध्ये अधून मधून टाळ्या तरी पडतात किंवा हास्याची लाट तरी उसळत असते. पुण्यात शनिवारी नेमके तेच घडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह राष्ट्रवादीतील दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर आले होते.तिथे कोण काय बोलणार? याविषयी राज्यात मोठी उत्सुकता निर्माण झालेली होती. शिंदे यांनी खुमासदार शैलीत सभा गाजवली. पवारांच्या देखतच त्यांनी शब्दांचा धमाका उडवला. शरदरावांवर स्तुतीसुमने उधळत विरोधकांना जोरदार धक्काही दिला. त्यामुळे पुणेकर मनमुराद हसून शिंदे यांच्या विधानांना मनसोक्त दाद दिली.**



झाले असे की- शनिवारी पुण्यात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मांजरी बुद्रुक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत खेळीमेळीत पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, विश्वजीत कदम यांच्यासह अनेक दिग्गज नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते. शिंदे हे व्यासपीठावर येताच शरदरावांसह इतर नेत्यांनी उभे राहून त्यांना मान दिला. शिंदे हे जेव्हा बोलायला उभे राहिले, तेव्हा सभेतील वातावरण स्तब्ध झाले होते. कारण काय बोलणार? हीच उत्सुकता. पण शिंदे यांनी चक्क किमयाच केली.

सुरूवातीलाच त्यांनी शरदरावांची प्रशंसा केली. पवार साहेब हे देशाचे आणि राज्याचे अनुभवी नेते आहेत. सहकार क्षेत्रात त्यांनी अनेक बदल घडवले, कृषी क्षेत्रात शरद पवार यांचे फार मोठ योगदान आहे. त्यांना कृषी क्षेत्राबद्दल आत्मीयता असून गाढा अभ्यास देखील आहे. त्यांच्यामुळे एक वेगळी उंची लाभली, जे सत्य आहे ते मी बोललो.

ज्यांच्या तोंडी नेहमी साखर असते ,ते शरद पवार,अशा शब्दात शिंदे यांनी प्रशंसा करताचा सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला. शिंदे हे पठडीचे नेते.त्यांच्याही अंगी हजरजबाबीपणा आहे. बोलता बोलता त्यांची नजर जयंत पाटील यांच्याकडे वळली. जयंत पाटील यांच्याही तोंडात साखर असते. असे शिंदे म्हणताच एकच हशा पिकला.

### कारखान्यांविषयी कृतज्ञता...

शिंदे यांनी याप्रसंगी राज्यातील साखर कारखान्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. करोना काळात साखर कारखान्यांनी सामाजिक बांधिलकी जपत मदत केल्याचे आपण सर्वांनी पाहिले आहे. ऊस उत्पादक शेतकरी वर्गासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. हे लक्षात घेऊन आमचे सरकार आल्यावर ३१ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्याचा उल्लेख त्यांनी केला.

### अजितदादांनी संयम ठेवला...

अजितदादा हेही कसलेले नेते. आक्रमक नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महाआघाडीची सत्ता गेल्यानंतर विरोधक म्हणून अजितदादा शिंदे-फडणवीस सरकारची चिरफाड करत असतात. सत्ताधाऱ्यांची प्रशंसा हा अजितदादांचा स्वभाव नाही. ठोकणे हाच त्यांचा धर्म.ही सभा बिगर राजकीय होती.त्यात शरदराव असताना अजितदादा बोलण्याचे पथ्य पाळतात. मुख्यमंत्र्यांना खरमरीत शब्दात ते उत्तर देवू शकले असते पण हे राजकीय व्यासपीठ नाही,याचे भान ठेवून अजितदादांनी सयंम राखला हे विशेष.

### अखेर टोला लगावलाच.

शरदरावांची प्रशंसा करून झाल्यानंतर शिंदे यांनी अखेर पवारांच्या देखतच विरोधकांना टोला लगावलाच. शिंदे यांच्या दावोस दौऱ्या वरून विरोधक आक्रमक झाले आहेत.शिंदेंवर टीका होते आहे.त्याचा उल्लेख करून शिंदे म्हणाले की, दावोसमध्ये हजारो कोटींचे करार झाले आहे. त्यामुळे आपल्या राज्यात मोठी गुंतवणूक आली. त्यावर कोणी काही म्हणू दे, आम्ही आकडे वाढविण्यासाठी करार केलेले नाहीत. मागे काय झाले, कोणाबरोबर करार केले, यात मी जात नाही. येणाऱ्या काळात तुम्हाला खात्री पटेल. काहींचे करार राहिले आहेत, ते ही राज्यात येणार आहेत. राज्याची प्रगती योग्य होईल. त्यांना आरोप आणि टीका करण्यापलीकडे दुसरे काही काम आहे का? त्यांना टीका करू दे आम्ही कामातून उत्तर देऊ, अशा शब्दात शिंदे यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

## अल्पवयीन मुलीचे फोटो काढून विनयभंग

सुराज्य/सोलापूर

एका सतरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे कपडे काढून तिचा गळा पकडून विनयभंग केल्याप्रकरणी एकाजणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोलापुरात घडली.याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून संकेत राजेंद्र शिनगारे (रा. सोलापुर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

२९ डिसेंबर रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास पीडित मुलीच्या घरात घुसून तिचा गळा पकडून तिच्यासोबत जबरदस्ती करत अश्लील फोटो काढून तिचा विनयभंग केला.

पीडित मुलीने फोटो डिलीट करण्यासाठी विनंती केली असता, संकेतने पुन्हा तिचा विनयभंग करत तिला कोऑपरेट कर असे म्हणाला.त्यानंतर दि.१९ जानेवारी रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास संशयित आरोपी संकेत याने पीडित मुलीची अडवणूक करून शिवीगाळ करत पीडित मुलीला मारून गळा दाबत ढकलून दिले, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास म.पो.स.ई. जेऊघाले हे करीत आहेत.

## ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील दोघे ठार

**पंढरपूर** : तालुक्यातील सोनके गावानजीक ट्रकने समोरून धडक दिल्यामुळे दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्याच उपचारापूर्वी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली.

या अपघातात मनोज राजाराम शिरगिरे (रा. अजनसोंड) आणि संदीप हनुमंत पवार (रा. खेडभोसे) यांचा मृत्यू झाला आहे. मनोज हा शनिवारी एम.एच. ४५ क्यु. ९९७२ या दुचाकीवरून पंढरपूर कडे येत होते. त्यांना महूद कडे जाणाऱ्या एम.एच.४६ एच.४५८८ या ट्रकने समोरून जोरात धडक दिली. यामध्ये मनोज हा खाली पडला असता त्याच्या डोक्यावरून ट्रकच चाक गेल्याने तो मयत झाला तर त्याचा मित्र संदीप हा जखमी झाला होता मात्र उपचाराला घेऊन जातानाच त्याचा देखील मृत्यू झाला. घटनेनंतर ट्रक चालकाने तेथून पळ काढला.

## पत्नीचा खून; पतीला ७ दिवसांची कोठडी

### श्रीपत पिंपरी येथील घटना

सुराज्य/सोलापूर

दारू पिण्यास पैसे दिले नाही तसेच घरगुती झालेल्या भांडणात जड वस्तूने डोके आणि तोंडावर मारून पत्नीचा खून करण्यात आला. ही घटना श्रीपत पिंपरी ता.बार्शी) येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. पोस्टमार्टमचा अहवाल आणि पोलिसांच्या तपासात खून केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली.




अलका अनिल येवारे (वय ४५ रा.श्रीपत पिंपरी)असे खून झालेल्या विवाहितेचे नाव आहे. तिचा पती अनिल श्रीमंत येवारे (वय ५२) याला बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी अटक केली. त्याला ७ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने शनिवारी दिला.

शनिवारी रात्री १० वाजेच्या सुमारास नातेवाईकांनी अलका व्यवहारे हिचा मृतदेह रुग्णालयात दाखल केला होता. शवविच्छेदनाच्या अहवालात डोक्यात प्रहार झाल्याने मृत्यू झाल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी मयताच्या मुलाजवळ चौकशी केली असता हा प्रकार उघडकीस आला.

दरम्यान सरकारतर्फे या घटनेची फिर्याद पोलीस नाईक अभिजीत गाटे (रा.बार्शी तालुका पोलीस ठाणे) यांनी दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपीला अटक करून २८ जानेवारी पर्यंतची पोलीस कोठडी घेतली. सहाय्यक निरीक्षक परजणे पुढील तपास करीत आहेत.

## ठेच लागून पडल्याने इसमाचा रुग्णालयात मृत्यू

सुराज्य/सोलापूर

पायी चालत जाताना ठेच लागून पडून गंभीर जखमी झालेला ३६ वर्षीय इसम शासकीय रुग्णालयात उत्तर घेताना शनिवारी सकाळी मयत झाला. ही घटना अक्कलकोट रोडवरील नूतन नगर येथे घडली. राजकुमार गेनप्पा कोणुरे (वय ३६ रा. नूतननगर) असे मयताचे नाव आहे. सोमवार दि.१६ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास घराजवळ ठेच लागून पडल्याने पायास मार लागून ते जखमी झाले होते. त्यांना खाजगी उपचार करून गुरुवारी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ते शनिवारी सकाळी मयत झाले. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## सोलापूर रेल्वे स्थानकावरून महिलेचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास

सुराज्य/सोलापूर

सोलापूर रेल्वे स्थानकावरून एका महिलेच्या हातातील बॅगची चैन खोलून त्यातील सोन्याची कर्णफुले व चांदीची गळ्यातील साखळी असा ५५ हजार रुपये किमतीचे दागिने चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.१९जानेवारी रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी निकिता वांगा (वय-२३,रा.प्रताप रेसिडेन्सी, हैदराबाद) यांनी सोलापूर रेल्वे पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.

निकिता त्यांच्या कुटुंबासोबत गाडी क्र.१७०२९ या विजापूर हैदराबाद एक्सप्रेस बोगी क्र.एस-१,बर्थ नं.४२४३४५ असा प्रवास करण्याकरिता सोलापूर रेल्वे स्टेशन येथून गाडीत चढत होत्या. त्यावेळी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या आईच्या हातातील बॅगची चैन खोलली. त्यातील सोन्या-चांदीचे दागिने मिळून ५५ हजारांचा ऐवज चोरून नेत पलायन केले, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## भारताचा न्यूझीलंडवर मालिका विजय

### मोहम्मद शमी सामनावीर

**रायपूर** : भारताने दुसऱ्या सामन्यासह न्यूझीलंडविरुद्ध तीन सामन्यांची २-० ने जिंकली. रायपूरमध्ये शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. सामन्यात पूर्णपणे पहिल्या चेंडूपासून टीम इंडियाचे वर्चस्व पाहायला मिळाले. मोहम्मद शमीला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.




न्यूझीलंड संघाने प्रथम फलंदाजी करताना ३४.३ षटकांत सर्वबाद १०८ धावा केल्या. त्यामुळे भारताला विजयासाठी १०९ धावांचे लक्ष्य मिळाले. न्यूझीलंडने ठेवलेल्या १०९ धावांचा पाठलाग करताना कर्णधार रोहित शर्माने ४९ चेंडूत ५१ धावा केल्या. शुबमन गिलने ५३ चेंडूत ४० धावांचे योगदान दिले. विराट कोहलीने ९ चेंडूत ११ धावा केल्या.

भारताकडून गोलंदाजी करताना मोहम्मद शमीच्या माऱ्यावर पुढे न्यूझीलंडची दाणादाण उडाली. न्यूझीलंड संघाचे ५ फलंदाज अवघ्या १५ धावांवर गारद झाले. होते. मायकेल ब्रेसवेल व ग्लेन फिलिप्स यांनी ४१ धावांची भागीदारी करताना न्यूझीलंडची गाडी रुळावर आणत संघाला १०८ पर्यंत नेले. भारताकडून मोहम्मद शमीने सर्वाधिक ३ बळी घेतले. हार्दिक पांड्या आणि वाशिंग्टन सुंदरने प्रत्येकी २ गडी बाद केले. मोहम्मद सिराज, शार्दुल ठाकुर आणि कुलदीप यादव या गोलंदाजांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




अहो घाबरू नकाऽऽ
कार्यक्रमाची पत्रिका आहे ही!

कल्याण
459-82-246

## उड्डाणपुलासाठी भूसंपादन प्रक्रिया

## जागा ताबा पावतीवर १८ मिळकतदारांच्या घेतल्या सह्या

सुराज्य/सोलापूर

शहरात होत असलेल्या प्रस्तावित जुना पुना नाका ते पत्रकार भवन या उड्डाणपूलासाठी पहिल्या टप्प्यात भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पहिल्याच दिवशी सुमारे जागा ताबा पावतीवर १८ ते २० मिळकतदारांच्या सह्या प्रशासनाने करून घेतल्या आहेत. उर्वरित प्रक्रिया पुन्हा सोमवारी हाती घेण्यात येणार आहे.



सोलापूर शहरातून जुना पुना नाका ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन असे विविध दोन मार्गांवरील दोन उड्डाणपूल होणार आहेत. भूसंपादन विशेष घटकाने सुचित केल्यानुसार बाधित मिळकती ताब्यात घेण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. यासाठी विविध भागाचे टप्पे पाडण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात दि. २० जानेवारी २०२३ पासून जुना पुना नाका, छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी चौकादरम्यान असलेल्या बाधित ३० मिळकती ताब्यात घेण्यास प्रारंभ करण्यात आहे. पाच टप्प्यात बाधित मिळकती ताबा पावतीवर संबंधित मिळकतदारांच्या सह्या घेण्याची सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महापालिकेकडून मालमत्ता पत्रकावर नाव लावण्याची पुढील कार्यवाही होणार आहे. याशिवाय बाधित होणाऱ्या शासकीय मिळकती विनामोबदला महापालिकेच्या ताब्यात मिळण्यासाठी तसे पत्रव्यवहार देखील करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंतच्या ३० मिळकती ताब्यात घेण्यात येणार आहेत. यात पहिल्या दिवशी १८ मिळकत दाराच्या जागा ताबा पावतीवर सह्या घेण्यात आल्या आहेत. काही मिळकतदार आजारी असल्याने तर काहींजण परगावी असल्याने त्यांच्या सह्या घेऊ शकल्या नाहीत.

### ताबा पावती झाल्याशिवाय मोबदला नाही

नुकसान भरपाई न देता जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. हे चुकीचं आहे, अशी भूमिका बाधित मिळकतदारांनी व्यक्त केल्याबाबत महापालिका उपअभियंता दिवाणजी यांना विचारले असता, सध्या ताबा पावतीवर मिळकतदारांच्या सह्या करून घेतल्या जात आहेत. नियमानुसार ताबा पावती झाल्याशिवाय मोबदला दिला जात नाही, असे त्यांनी सांगितले.

## मुलीला मेसेज केल्याचा जाब विचारल्याने मारहाण

**सोलापूर** : आपल्या नात्यातील मुलीला इंस्टाग्राम आयडी वरून मेसेज का करतो? असे विचारल्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना आठवण फाटा (ता.माळशिरस) येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली.या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी तिघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अभिषेक तानाजी पवार (वय १९ रा. आठवण फाटा) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून बाजीराव सतीश सोनवणे (रा. तलाठी कॉलनी, माळशिरस) महेश चव्हाण आणि अक्षय खरात (दोघे रा. जाधव वस्ती) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. अभिषेक पवार याने बाजीराव विचारणा केली होती. त्या कारणावरून तिघांनी त्याला मारहाण केली. हवालदार सोनटक्के पुढील तपास करीत आहेत.